अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
०५.०८.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १८६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712


## नितीन गडकरींना हायकोर्टाचा मोठा दिलासा, ई-२० इंधनाबाबतचा आक्षेपार्ह मजकूर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** - देशात नव्याने लागू झालेले इथेनॉल धोरण आणि इथेनॉलमिश्रित इंधनासंदर्भात सुरु असलेल्या वादावरुन सोशल मीडियावर नेटकऱ्यांच्या टीकेचे लक्ष्य ठरत असलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे.

गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर नितीन गडकरी यांच्याबद्दल मोठ्याप्रमाणावर व्हिडीओ आणि इतर मजकूर पसरवण्यात आला होता. याविरोधात नितीन गडकरी यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत मेटा, गुगल, एक्स या समाजमाध्यमांवरील सगळा मजकूर हटवण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. काही दिवसांपूर्वीच उच्च न्यायालयाने नितीन गडकरी यांची ही याचिका दाखल करुन घेतली होती. यावेळी न्यायालयाने इथेनॉलमिश्रित इंधनासंदर्भात सुरु असलेल्या वादाशी निगडित अख जनरेटेड कथित बदनामीकारक डीपफेक व्हिडिओ तसेच छेडछाड करण्यात आलेला डिजिटल कंटेंट हटवण्याचे निर्देश सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना दिले आहेत. न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या एकलपीठाने हा निकाल दिला आहे.

नितीन गडकरी यांनी मेटा प्लॅटफॉर्म, एक्स तसेच गुगल LLC आणि इतरांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेत इथेनॉलमिश्रित पेट्रोल आणि ए-२० उपक्रमाशी माझा संबंध जोडणारी कथित बदनामीकारक सामग्री हटवण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच हे दोन्ही उपक्रम केवळ केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या अखत्यारित राबविले जातात आणि त्यांचा काहीही संबंध नसल्याचा याचिकेत दावा करण्यात आला होता. संबंधित मजकूर आणि व्हिडिओ प्रथमदर्शनी खोटे, बनावट, द्वेषपूर्ण, आक्षेपार्ह आणि अत्यंत बदनामीकारक असल्याचा दावा करत हटवण्याची मागणी गडकरी यांच्यामार्फत करण्यात आली होती.

## भारतीय अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर होईल

### केंद्रीय अर्थमंत्र्यांचा आयएमएफ हवाल्याने दावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** - आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार भारतीय अर्थव्यवस्था २०२८-२९ या आर्थिक वर्षात ५ ट्रिलियन डॉलरचा टप्पा ओलांडण्यासाठी सज्ज आहे आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकारने व्यापक विकास धोरण स्वीकारले आहे, अशी माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी राज्यसभेत दिली.

'आयएमएफ'ने प्रसिद्ध केलेल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलुक' डेटाबेसनुसार (एप्रिल २०२६), भारताचा सध्याच्या किमतींवरील जीडीपी २०२८-२९ पर्यंत सुमारे ५.१ ट्रिलियन डॉलर होण्याचा अंदाज आहे, असे त्यांनी सांगितले.

शेतीची उत्पादकता वाढवणे, उत्पादनाला प्रोत्साहन देणे, एमएसएमईना पाठबळ देणे, पायाभूत सुविधांचा विस्तार करणे, लॉजिस्टिक आणि ईझ ऑफ डूइंग बिझनेस (व्यवसाय सुलभता) सुधारणे, प्राप्तिकर व जीएसटी सुधारणांद्वारे कार्यक्षम आणि सुटसुटीत कर प्रणाली निर्माण करणे, नावीन्यता आणि डिजिटल तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे, मानवी भांडवल मजबूत करणे आणि ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करणे यावर भर देणारे व्यापक विकास धोरण सरकारने स्वीकारले आहे, असे त्या म्हणाल्या. सार्वजनिक भांडवली खर्चावर दिलेला निरंतर भर, थेट परकीय गुंतवणूक नियमांचे उदारीकरण, निर्यातीला दिलेली चालना आणि सुजाण आर्थिक व्यवस्थापन व किमतींच्या स्थिरतेद्वारे मॅक्रोइकॉनॉमिक पायाभूत घटक मजबूत करणे, यामुळे या धोरणाला अधिक बळ मिळत आहे.



**उपक्रमाचा उद्देश**

उत्पादन क्षेत्राचा विकास करण्यासाठी 'उत्पादनाशी जोडलेली प्रोत्साहन योजना', 'मेक इन इंडिया', 'राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण', 'नॅशनल सिंगल विंडो सिस्टीम' आणि 'पीएम गतीशक्ती' यासारख्या उपक्रमांचा उद्देश देशांतर्गत उत्पादन वाढवणे, गुंतवणूक आकर्षित करणे, रोजगार निर्मिती करणे आणि स्पर्धात्मकता सुधारणे हा आहे. हे प्रयत्न एमएसएमई क्षेत्राला मजबूत करण्यासाठी घेतलेल्या विशेष उपायांमुळे अधिक व्यापक होतात, असे सरकारच्या वतीने नमूद करण्यात आले.

### थोडक्यात

## मुंबईत निवासी डॉक्टरांचा संप : ओपीडी बंद, रुग्णांचे हाल सुरू



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - मुंबईतील महापालिका रुग्णालयांमध्ये निवासी डॉक्टरांच्या संपामुळे हजारो रुग्णांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स यांनी आजपासून केईएम, लोकमान्य टिळक (सायन), नायर आणि कूपर रुग्णालयांमधील नियमित बाह्यरुग्ण विभाग सेवा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे उपचारासाठी आलेल्या अनेक रुग्णांना तपासणी न होताच परतावे लागले, तर काहींना खासगी रुग्णालयांचा पर्याय स्वीकारावा लागला.

### अमित शाह काही केल्या संसदेत येईनात, विरोधकांचा एल्गार सुरुच

## राम मंदिरातील लूट, विद्यार्थ्यांच्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ विरोधकांचा मोर्चा

### बॅनर्सनी सुद्धा लक्ष वेधलं!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**दिल्ली** - दिल्लीमधील पोलिसांच्या विद्यार्थ्यांवरील अत्याचारानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह संसदेत फिरकले नसल्याने विरोधकांनी सुद्धा अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे.

संसदेच्या प्रांगणात आणि संसदेतही विरोधकांचा एल्गार सुरु आहे. आजही संसद परिसरात विरोधी पक्षाच्या खासदारांनी आंदोलन केले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह विरोधी पक्षाच्या खासदारांनी घोषणाबाजी करत गांधी पुतळ्यापासून मकर द्वारपर्यंत मोर्चा काढला.

अमित शाह यांनी संसदेत हजर राहून उत्तर द्यावे २० जुलै रोजी जंतर मंतर आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जवरून आणि राम मंदिरातील नैवेद्याच्या चोरीवरून विरोधी पक्षाचे खासदार सरकारवर निशाणा साधत आहेत. गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत हजर राहून उत्तर द्यावे, अशी त्यांची मागणी आहे. आज सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू झाले आणि एका मिनिटातच दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. राज्यसभेचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

लाठीचार्जचा आदेश कोणी दिला? दुसरीकडे, आतापर्यंत संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील आठपैकी तीन विधेयके दोन्ही सभागृहांनी मंजूर केली आहेत. उर्वरित पाच विधेयके दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर करण्याची सरकार तयारी करत आहे. खासदार प्रियांका गांधी यांनी विचारले की, 'लाठीचार्जचा आदेश कोणी दिला?' त्या म्हणाल्या, 'जर मुलांवर गोळ्या, पेलेट गन, अश्रुधूर किंवा लाठीचार्ज करण्याचे आदेश दिले गेले असतील, तर कोणीतरी जबाबदार असले पाहिजे.

## अमित शाह ज्या पद्धतीने लपून बसलेत ते पाहता गुंगा गुड्डा झालेत, मोदी सुद्धा गुंगा गुड्डा झालेत : संजय राऊतांचा हल्लाबोल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**पुणे** - अमित शाह जे सध्या लपून बसले आहेत ती भूमिका त्यांनी स्वीकारली आहे का? त्यांना गुंगा गुड्डा म्हणाव लागेल ना? मोदी सुद्धा गुंगा गुड्डा झालेत अशी खोचक टीका खासदार संजय राऊत यांनी केली. जोपर्यंत गृहमंत्री संसदेत येऊन जंतरमंतरवर लाठी चार्ज, टिअर गॅस, पॅलेट गन्स चालवण्याचे आदेश कोणी दिले हे सांगत नाही, तोपर्यंत सभागृहाचं कामकाज चालणार नाही, असा इशाराच राऊत यांनी दिला. दरम्यान, आजही (५ ऑगस्ट) संसदेत इंडिया आघाडीकडून अमित शाह संसदेत येत नसल्याने आंदोलन करण्यात आले. सुनेत्रा पवार वादावर काय म्हणाले? दरम्यान, सुनेत्रा पवारांना उद्देशून झालेल्या टिप्पणीनंतर राऊत यांनी भाष्य केले. त्या जागी कोणी जर एखादा पुरुष मंत्री असता, तर त्यांना गुंगा गुड्डा म्हटल असतं आपण राजकारणामध्ये आहोत आपण ही टीका सहन केली पाहिजे आणि भविष्यात या चुका होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे, असे ते म्हणाले आहे.

## राष्ट्रवादीने रुपाली चाकणकरांचा उत्तराधिकारी निवडला, सुनील तटकरेंचा मोठा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - राजकारणाची सुरुवात दिवंगत अजित पवार यांच्यामुळे झाली. आज ते हवे होते, त्यांची कायम उणीव जाणवत राहील. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते पत्र मिळाले. त्यामुळे आज जबाबदारी खुप वाढली आहे. दादांची 'कामाचा माणूस' ही ओळख आम्हाला आणखी तळागाळात घेऊन जायचं आहे. गेल्या २६ वर्षांचा हा प्रवास आहे. पंचायत समिती सदस्य, महानंद दूध डेअरी चेअरमन, पुणे जिल्हा राष्ट्रवादी महिला अध्यक्ष पद, असे १४ वर्ष काम करण्याची संधी मिळाली आहे. जबाबदारी मोठी समजून काम करायला हवं. अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे यांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे यांची, तर युवक प्रदेशाध्यक्षपदी निखिल ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




शिपाई म्हणुन रुजु करुन घेण्याचे आदेश होवुनही

# जि.प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाला खो

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाला जामंगाव (ख.) ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांनी केराची टोपली दाखविली असून शिपाई म्हणुन दिक्षित वानखडे यांना रुजु करुन घेण्याचे दोन वेळा आदेश देवुन सुध्दा अद्यापही रुजु करुन न घेतल्याने व सरपंच सातत्याने हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.



प्राप्त माहितीनुसार, जामंगाव (ख.) येथील दिक्षित अरुणराव वानखडे यांची ग्रामपंचायत कार्यालयामध्ये शिपाई म्हणुन नियुक्ती करावी, असे आदेश जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नुकतेच काढले होते. हे आदेश पंचायत समिती गटविकास अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आले होते. गटविकास अधिकारी यांनी संबंधित सचिवाला पत्र देवुन जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये दिक्षित यांना रुजु करण्याचे आदेश २१ मे २०२६ रोजी दिले. या आदेशाची प्रत सोबत घेत दिक्षित यांनी अनेकदा ग्रामपंचायत कार्यालयाचे उंबरठे झिजविले परंतु काहीही उपयोग झाला नाही. अखेर दिक्षित यांनी पुन्हा जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयात जावुन तक्रार केली, त्या तक्रारीवरुन जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस यांनी २९ जुलै २०२६ रोजी पुन्हा आदेश काढले परंतु तरी सुध्दा अद्यापही दिक्षित यांना रुजु करुन घेण्यात आले नाही त्यामुळे जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाचे पालन केल्या जात नसतील तर याला म्हणावे तरी काय? असा प्रश्न या निमित्ताने उभा ठाकला आहे.

# एअर इंडियाचे विमान आले अचानक ३०० फूट खाली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – फुकेतवरून दिल्लीकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला मंगळवारी सकाळी हवेत तीव्र टर्ब्युलन्सचा (वेग, दाब, दिशाबदल) सामना करावा लागला. या दरम्यान विमान अचानक सुमारे ३०० फूट खाली आले. या घटनेत विमानातील १५ जण जखमी झाले असून, यामध्ये एका केबिन क्रू सदस्याला गंभीर दुखापत झाली आहे. फुकेतवरून उड्डाण केलेले 'एआय २३७९' हे ए-३२० नॅरो-बॉडी विमान सकाळी ११:३० वाजताच्या सुमारास दिल्ली विमानतळावर सुरक्षितपणे उतरले. या विमानात १३४ प्रवासी आणि ८ क्रू मेंबर्ससह एकूण १४२ जण प्रवास करत होते. नागरी उड्डाण महासंचालनालयाने या दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी झालेल्या १५ जणांमध्ये ११ प्रवासी आणि ४ केबिन क्रू सदस्यांचा समावेश आहे.

खिदमत फाऊंडेशनच्या वतीने

# महासारथी आयडी शिबिराचे यशस्वी आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथे खिदमत फाऊंडेशनच्या वतीने महासारथी आयडी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून आपल्या मान्यवर उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढविली.



कार्यक्रमादरम्यान खिदमत फाऊंडेशनच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवर महिला पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारमुर्तींमध्ये महिला विधानसभा प्रमुख सविता काळे, महिला शहराध्यक्ष रसिका बरडे, शहर सचिव रोशनी, पूजा नरहरे, महिला शहर उपाध्यक्षा तथा नगरसेविका मनिषा उईके यांचा समावेश होता. याप्रसंगी वसीम शेख यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून आपला सहभाग नोंदविला.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी खिदमत फाऊंडेशनच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत महासारथी आयडीसारखी शिबिरे समाजातील गरजू नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे मत व्यक्त केले.

भविष्यातही अशा लोकहितकारी उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचा समारोप उपस्थित नागरिकांचे आभार मानून करण्यात आला.

राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त

# पुसला येथील ऑक्सिजन पार्कमध्ये ६७ झाडांचे वृक्षारोपण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – मोर्शी मतदारसंघाचे माजी आमदार तथा राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त ६७ झाडांचे वृक्षारोपण ऑक्सिजन पार्क पुसला येथे करण्यात आले

माझा वाढदिवस सेवा आणि समर्पण या माध्यमातून साजरा करावा, असा संदेश खासदार महोदयांनी दिला होता. त्यामुळे पुसला गावातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी, युवक व विद्यार्थ्यांनी एकत्रित येत खासदार डॉ.अनिल बोंडे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहामध्ये बेल नदी किनारी ६७ झाडांचे वृक्षारोपण करुन साजरा करण्यात आला.





यावेळी मोठ्या प्रमाणामध्ये युवक व विद्यार्थी सहभागी झाले. जेष्ठ भाजपा कार्यकर्ते इंद्रभूषण सोंडे यांच्या मार्गदर्शनामध्ये अशोक खेरडे, राजेंद्र श्रीराव, संजय श्रीराव, गणपत नारनवरे, रमेश गजबे, जानराव उईके, अरविंद कोठे, नितीन खंडेलवाल, सचिन वाकडे, मयूर श्रीराव, अक्षय पवार, वृक्षमित्र शरद वरुडकर, स्वयंअध्ययन केंद्राचे संचालक सुरज गुल्हाने व विद्यार्थी, जनता हायस्कूलच्या मुख्याध्यापिका विजया काळे, शिक्षक वृंद, विद्यार्थी, ज्योती कुकडे, पुसलाच्या उपसरपंच सीमा काळे, ग्रामपंचायत सदस्य गंगा धानोरकर, जागृती कॉन्व्हेंटच्या संचालिका रीना शिरभाते, शिक्षक वृंद विद्यार्थी व महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले. उपस्थितांचे आभार रुपाली इंद्रभूषण सोंडे यांनी मानले.

# अनेक विद्युत पंप चोरीला मात्र चोरटा अद्याप फरारच!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

सिंधु टाकसाळे यांची जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे तक्रार

**वरुड** – शहरात सद्य: चोरटयांचा सुळसुळाट झाला असून प्लॉटवर सुरु असलेल्या बांधकामावर पाणी मारण्याकरीता विहीरीत टाकलेला विद्युत पंप एक नव्हे तिनदा चोरुन नेल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात असुन यासंदर्भात पोलिसांत तक्रार देवुन सुध्दा चोरटयाचा शोध घेण्यात पोलिसांना अपयश आल्याची तक्रार सिंधु टाकसाळे यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक यांचकडे केली आहे.

या तक्रारीत नमुद करण्यात आले आहे की, शहरातील वार्ड क्र.१ मिरची प्लॉट परिसरातील सिंधु टाकसाळे यांनी त्यांच्या मालकीच्या प्लॉटमध्ये बांधकाम सुरु केले. त्या बांधकामावर पाणी मारण्याकरीता १ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्युत पंप खरेदी केला परंतु काही दिवसांतच तो चोरीला गेला. त्यानंतर पुन्हा नविन विद्युत पंप विकत घेतला आणि काम सुरु केले परंतु काही दिवसांतच तो सुध्दा चोरीला गेला. या परिसरात विद्युत पंप चोरीला गेल्याच्या आतापर्यंत किमान ५ घटना घडल्या आहेत परंतु अद्याप चोरटयाचा शोध लागु शकला नाही त्यामुळे चोरटा कोण? याचा शोध लावुन आम्हा सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवुन द्यावा, अशी मागणीही सिंधु बबनराव टाकसाळे यांनी केली आहे.

# कौटुंबिक वादातून संतापजनक कृत्य! ९ महिन्यांच्या बाळाच्या तोंडात टाकलं फेव्हीक्विक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***पुणे*** – घरातील वादाचा राग चिमुकल्यावर काढल्याची संतापजनक घटना पुण्यात घडली आहे.

घरगुती भांडणातून एका महिलेने अवघ्या नऊ महिन्यांच्या बाळाच्या तोंडात फेव्ही क्विक टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेत बाळाच्या तोंडाला गंभीर जखमा झाल्या असून त्याच्यावर ससून रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी लोहगाव पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी अल्ताप नबी शेख (३९) यांनी लोहगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी सानिया शेख, रियाज इमाम हाल्याळ आणि हाजी मलंग शेख यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. हा धक्कादायक प्रकार ३१ जुलै रोजी पहाटे सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास लोहगावमधील कलवड वस्ती येथील त्यांच्या राहत्या घरी घडला.

डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे थोर समाज सुधारक, लोककवी, लेखक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली.




याप्रसंगी दीपप्रज्वलन करुन अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला हारार्पण व पूजन मुख्याध्यापिका नीता चिमोटे व आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापिका निता चिमोटे यांनी भाषणातून दलित वर्गासाठी अण्णाभाऊ साठे यांनी अनमोल कार्य केले आपल्या धारदार लेखणीतून व पोवाडाच्या माध्यमातून दलित वंचिताचे प्रश्न मांडले व विपुल साहित्य निर्माण करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

प्रास्ताविक व संचालन शिक्षिका वनिता अकर्ते यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हातभार लावला.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटना एएमटी २

# तालुका शाखेची महत्वपूर्ण सभा उत्साहात संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटना एएमटी २ शाखा वरुड यांची महत्वपूर्ण सभा राज्याध्यक्ष मंगेश ढोरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.



सभेच्या प्रारंभी मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले तसेच जमा-खर्चाचा आढावा घेण्यात आला व प्राप्त तक्रार अर्जांवर सविस्तर विचारविनिमय करून आवश्यक ती कार्यवाही करत तक्रारी निकाली काढण्यात आल्या.

**माजी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा हृदयस्पर्शी सन्मान**

या सभेचे सर्वात भावनिक आणि प्रेरणादायी वैशिष्ट्य म्हणजे माजी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सन्मान. ज्यांनी आपल्या आयुष्यातील अमूल्य वर्षे गावाच्या सेवेसाठी समर्पित केली, ऊन-वारा-पाऊस यांची पर्वा न करता अनेक हालअपेष्टा सहन केल्या आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जनतेची सेवा पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे बजावली, अशा माजी कर्मचाऱ्यांना सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी आयुष्यभर केलेल्या सेवेला अनेकदा अपेक्षित कौतुक किंवा सन्मान मिळाला नाही. त्यामुळे त्यांच्या समर्पित सेवेला मानाचा मुजरा म्हणुन एएमटी २ वरुड शाखेने घेतलेला हा सन्मानाचा निर्णय निश्चितच कौतुकास्पद ठरला.

**पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांचाही गौरव**

यावेळी पदोन्नती मिळवून पुढील पदावर गेलेल्या कर्मचाऱ्यांचा देखील सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील सेवेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

**मार्गदर्शन व संघटनात्मक चर्चा**

राज्याध्यक्ष मंगेश ढोरे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना संघटनेची भूमिका, कर्मचारी हिताचे प्रश्न, संघटनात्मक एकजूट आणि भविष्यातील लढ्याबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन राज्य संघटक राहुल उके, विभागीय उपाध्यक्ष राहुल ठवकर, जिल्हा सचिव आकाश गुळसुंदरे, अचलपुर सचिव अक्षय काळमेघ यांची उपस्थिती लाभली होती तसेच वरुड तालुकाध्यक्ष गितेश हरले, उपाध्यक्ष सागर वाघमारे, सचिव पांडुरंग लोखंडे, उपसचिव रमण मोहाडे, महिला अध्यक्ष मालती कोसरे, प्रमोद वानखडे, संदीप सातपुते, रोशन भाकरे, प्रवीण काकडे, किशोर भाकरे, आकाश तिखे, दीपक परतेती, दामोदर सोनवणे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता व समारोप तालुकाध्यक्ष गितेश हरले तसेच उपसचिव रमण मोहाडे यांच्या मार्गदर्शनातून करण्यात आली.

# संपादकीय

**आजचा संघर्ष उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो, विचार बदला आयुष्य बदलेल.**

## विदर्भातील पिकांचे भवितव्य : आव्हाने, संधी आणि शाश्वत शेतीची दिशा

विदर्भ हा महाराष्ट्रातील कृषीप्रधान प्रदेश म्हणून ओळखला जातो. अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या विदर्भात शेती हा अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. येथील लाखो शेतकऱ्यांचे जीवन शेतीवर अवलंबून असून कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, संत्रा, गहू, भात आणि विविध भाजीपाला ही प्रमुख पिके घेतली जातात. मात्र हवामानातील अनिश्चितता, बाजारपेठेतील चढ-उतार, उत्पादन खर्चातील वाढ आणि अपुरी सिंचन व्यवस्था यामुळे विदर्भातील शेती अनेक संकटांचा सामना करत आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भातील पिकांची स्थिती, त्यांच्यापुढील आव्हाने आणि भविष्यातील दिशा यांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. विदर्भाला 'कापसाचे कोठार' म्हणून देशभरात ओळखले जाते. काळ्या कसदार जमिनीमुळे येथे मोठ्या प्रमाणावर कापसाची लागवड केली जाते. कापूस हे नगदी पीक असल्याने शेतकऱ्यांना चांगल्या उत्पन्नाची अपेक्षा असते. परंतु बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीचा वाढता खर्च यामुळे उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. त्यातच गुलाबी बोंडअळी, अनियमित पाऊस आणि बाजारभावातील अस्थिरता यामुळे कापूस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. उत्पादन वाढले तरी भाव पडतो आणि भाव वाढले तर उत्पादन कमी होते, अशी परिस्थिती अनेक वर्षांपासून कायम आहे. सोयाबीन हे विदर्भातील दुसरे महत्त्वाचे पीक आहे. कमी कालावधीत येणारे आणि तेलबिया म्हणून महत्त्व असलेले हे पीक अनेक शेतकऱ्यांची पसंती आहे. मात्र अतिवृष्टी, दीर्घ खंड पडलेला पाऊस, रोगराई आणि काढणीच्या काळातील पावसामुळे मोठे नुकसान होते. अनेकदा शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल होत नाही. योग्य साठवणूक सुविधा आणि प्रक्रिया उद्योगांचा अभाव ही देखील मोठी समस्या आहे. विदर्भात तूर आणि हरभरा यांसारखी कडधान्ये मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. देशातील कडधान्य उत्पादनात विदर्भाचा मोलाचा वाटा आहे. ही पिके जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यास मदत करतात. तरीही बाजारभावातील अनिश्चितता, हमीभावाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी आणि खरेदी केंद्रांवरील विलंब यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळत नाही. नागपूर आणि अमरावती विभागातील संत्रा उत्पादन ही विदर्भाची विशेष ओळख आहे. नागपूर संत्र्याला देश-विदेशात मोठी मागणी आहे. मात्र हवामान बदल, पाण्याची कमतरता, बागांमधील रोगराई आणि निर्यातीसाठी आवश्यक सुविधा अपुऱ्या असल्याने संत्रा उत्पादकांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. आधुनिक तंत्रज्ञान, शीतगृह सुविधा आणि प्रक्रिया उद्योगांची उभारणी केल्यास संत्रा उत्पादकांना अधिक लाभ मिळू शकतो. पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये भात हे प्रमुख पीक आहे.

## आजचे राशीभविष्य

५ ऑगस्ट २०२६, बुधवार

**मेष** नवीन संधी मिळतील. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**तूळ** व्यवहारात सावधगिरी बाळगा. लाभाची शक्यता.

**वृषभ** आर्थिक स्थितीत सुधारणा. कुटुंबाचा पाठिंबा लाभेल.

**वृश्चिक** कौटुंबिक आनंद. रागावर नियंत्रण ठेवा.

**मिथुन** व्यवसायात यश. नवीन योजना लाभदायक ठरतील.

**धनु** अनावश्यक खर्च टाळा. प्रवास योग.

**कर्क** महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. संयम ठेवा.

**मकर** आर्थिक लाभ. नोकरीत प्रगतीची संधी.

**सिंह** मान-सन्मान वाढेल. कामात प्रगती होईल.

**कुंभ** करिअरमध्ये यश. नवीन संपर्क लाभदायक.

**कन्या** मानसिक समाधान. आरोग्याकडे लक्ष द्या.

**मीन** संयम ठेवा. व्यवसायात लाभाचे संकेत.

❈ हे राशीभविष्य सामान्य ज्योतिषीय संकेतांवर आधारित आहे. ❈

# जेन-झी आणि आंबेडकरी पक्षांचे राजकारण

२० जून ते २५ जुलै २०२६ या सलग ३६ दिवसांच्या दिल्लीतील जंतर-मंतर आंदोलनाने देशाच्या राजकारणात एक नवीन अध्याय लिहिला. या आंदोलनातून आंबेडकरी समाजातील तरुण नेतृत्व म्हणून अभिजित दीपके यांचा उदय झाला. एका अहंकारी सरकारला जे 'हमारे सरकारमे इस्तीफे नही होते' असे म्हणत, अशा सरकारच्या शिक्षणमंत्र्याला राजीनामा देण्यास भाग पाडले.

शिक्षणव्यवस्थेतील सुधारणांसाठी सुरू झालेल्या या संघर्षाने केवळ विद्यार्थ्यांचाच नाही, तर देशभरातील नागरिकांचाही प्रतिसाद मिळवला. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या यशामुळे या संघर्षाची देशव्यापी दखल घेतली गेली.

अभिजित दीपके हा काक्रोच जनता पार्टीचा संस्थापक आहे, एवढीच त्याची ओळख नव्हती तर ६ जून २०२६ रोजी जेव्हा तो अमेरिकेहून आंबेडकरांचा फोटो असलेलं पुस्तक हात उंचावून भारताच्या एअरपोर्टवर उतरला, त्याचवेळेस जनतेने त्याला 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' याचं प्रतिक म्हणून ओळखलं होतं. खरं तर त्याचं हे रूप पाहून जेन-झीचं मन अभिमानाने भरून आलं होतं. कारण जेन-झीने बाबासाहेबांना कधीचच स्विकारलं होतं, हे या निमित्ताने उघड झालं होतं. त्याचा प्रत्यय आंदोलनाच्या दरम्यान सर्वांनाच आलं. आंदोलनाचा हा एक नवा 'आंबेडकरी पॅटर्न' होता.

अभिजित दीपके हा आंबेडकरी समाजातला घटक असल्याने बाबासाहेब हे तर त्याची मूळ प्रेरणा होतीच; पण गांधीजीना सुद्धा सोबत घेतल्याने त्याचे नेतृत्व सर्वमान्य, सर्वसमावेशक म्हणून उदयास आलं. ही गोष्ट या निमित्ताने अधोरेखित झाली.

म्हणून आंबेडकरी समाजाने त्याच्याबाबत काय प्रतिक्रिया उमटविल्या याचा मागोवा घेणे गरजेचे वाटते, ते यासाठी की आंबेडकरी राजकारणावर त्याचा पूढे काय परिणाम होईल हेही पाहणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

आंबेडकरी राजकारणातील पहिली प्रतिक्रिया उमटली, ती म्हणजे वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांची. अभिजित दीपके जेव्हा बाबासाहेबांच्या फोटो असलेलं पुस्तक घेऊन दिल्लीच्या एअरपोर्टवर उतरला; तेव्हा त्यांचा मुख्य आक्षेप होता की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची अशी कोणतीही अधिकृत "My Autobiography" नावाची आत्मकथा नाही, जी दीपकेने हातात धरली होती. पुण्यात आल्यावर वंचित आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून बाबासाहेबांचं खरं पुस्तक "Waiting for a Visa" मागून घ्या, असा टोलाही वंचित आघाडीने लगावला होता.

सुजात आंबेडकर बोलले होते की, तो आरएसएसचा आहे. सुजातने व्यक्त होण्यासाठी खूप घाई केली होती आणि जेन-झी म्हणून प्रभावीपणे पुढे येण्याची संधी त्यांनी गमावली. पण प्रकाश आंबेडकर यांनी प्रत्यक्ष आंदोलनात भाग घेऊन परिस्थिती सांभाळली. अशा प्रकारे प्रकाश आंबेडकरांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय अनुभवाचा वापर करून अत्यंत कौशल्याने 'नुकसान नियंत्रण' (Damage Control) केले आणि पक्षाची बाजू सांभाळून घेतली, हे त्यांनी बरं केलं असं म्हणता येईल.

त्यानंतर आंबेडकरी पक्ष म्हणून राष्ट्रीय स्तरावर बहुजन समाज पार्टीला मानल्या जाते. पण या पक्षाने आंदोलनाबाबत कुठलीही भुमिका स्पष्टपणे घेतली नाही. ते या आंदोलनापासून चार हात दूरच राहण्याचे पसंत केले, असे म्हणावे लागेल.

जोगेंद्र कवाडे यांची तर बोलती बंदच होती. कारण हा पक्ष आताच्या काळात भाजपला शरण गेल्याचे सर्वांना माहितच आहे.

'अमेरिका से आया चुपके-चुपके, नाम है अभिजीत दिपके' असे म्हणत रामदास आठवले यांनी संसदेत फटकेबाजी करत लाठीचार्जच्या चौकशीची मागणी जरी केली असली तरी त्यांनी आंदोलनाला समर्थन दिले नाही. ते देणार पण नाहीत. कारण ते विद्यमान भाजप सरकारमध्ये एक मंत्री आहेत.

इतर फुटकळ पक्षांनी पण तोंड उघडले नाही. मात्र ऑल इंडिया पँथर सेना या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार हे पुणे येथील काक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात सहभागी झाले होते. तथापि ते नंतर मात्र आंदोलनाच्या दरम्यान दिसले नाहीत.

फक्त दोन आंबेडकरी राजकीय पक्षांनी या आंदोलनाला खुलेपणाने समर्थन दिले, ते म्हणजे उत्तरप्रदेशमधील आझाद समाज पार्टीचे (कांशीराम) चंद्रशेखर आझाद, जे देशात आंबेडकरी चळवळीचे एकमेव खासदार आहेत आणि महाराष्ट्रातील वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर. त्यांनी केवळ समर्थनच दिले नाहीत तर दोघांनीही प्रत्यक्ष जंतरमंतरला जाऊन हजेरी देखील दिली.

प्रकाश आंबेडकर यांनी सुजात आंबेडकरांच्या भुमिकेला दुर्लक्षून आंदोलनात उडी घेतली. महाराष्ट्रात त्यांच्या पक्षाने २३ जुलै २०२६ या विषयावर महाराष्ट्र बंद करून आंदोलनात आपल्या पक्षाचा सहभाग नोंदवला. प्रकाश आंबेडकर हे नेहमी लोकांच्या सोबत असतात हे परत एकदा सिद्ध झाले. म्हणून महाराष्ट्रात ते सर्वमान्य नेते म्हणून बघितले जाते.

चंद्रशेखर आझाद तर २० जुलै २०२६ रोजीच्या संसदेवरील मार्चमध्ये सामील झाले होते. त्यांनी संसदेच्या आवारात भरपावसात धरणे पण दिले होते. ते संसदेत आंबेडकरी चळवळीतील प्रतिनिधी म्हणून एकाकीपणे झुंज देत होते. चंद्रशेखर आझाद सोडले तर कोणत्याही आंबेडकरी पक्षाचा संसदेत अस्तित्व नाही. त्यामुळे संसदेत आंबेडकरी हुंकार उमटत नाही. पूर्वी बहुजन समाज पार्टीचे खासदार संसदेत होते. मा. कांशीरामजी यांनी या पक्षाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त पक्ष म्हणून तिसऱ्या क्रमांकावर आणले होते. आता मायावती यांच्या कारकिर्दीत शुन्यावर आली. इतकी या पक्षाची घसरण झाली आहे.

### विचारवंतांची भूमिका

काही विचारवंतांनी या आंदोलनाबाबत सावध भूमिका घेतली. काहींनी टीका केली तर काहींनी अनुल्लेखाने मारले. आनंद तेलतुंबडे यांनी अशी चिंता व्यक्त केली की, आंदोलनाच्या केंद्रस्थानी डॉ.आंबेडकरांची प्रतिमा आल्यामुळे त्याचा व्यापक स्वीकार मर्यादित होऊ शकतो. परंतु आंदोलनाच्या घडामोडींवरून अनेक निरीक्षकांचे मत असे होते की विविध समाजघटकांचा सहभाग कायम राहिला.

संसदेवरील मोर्चामध्ये सहभागी होण्यासाठी सोमवारी सकाळी सर्व थरांतील आणि वयोगटातील नागरिक जंतर-मंतरकडे जमा होत होते. संसद परिसरापासून दोन किमी अंतरावर नीती आयोग भवनाजवळील 'नॅशनल एज्युकेशन इन्स्टिट्यूट फॉर ट्रायबल अफेअर्स'च्या इमारतीजवळ 'जयभीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. त्याशिवाय अन्यत्रही अनेक आंदोलकांच्या हातात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा, पुस्तके होती. काही जणांच्या हातात महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचीही प्रतिमा होती. शीघ्र कृती दल (आरएएफ) आणि दिल्ली पोलिसांनी निदर्शकांच्या मार्गात अडथळे उभे केले, पण निदर्शक हटायला तयार नव्हते. अभिजित दीपके यांची ३१ जुलै २०२६ ला मुंबई TALK या टिव्ही मिडियाने एक्ल्यूझीव्ह इंटरव्ह्यू घेतली त्यावेळी त्याने सांगितले की, 'आंबेडकर हे एका समाजाचे नाहीत, ते पूर्ण देशाचे.' आंदोलनाच्या दरम्यान गेली ३६ दिवस दिल्लीत एकच नारा होता, 'जय जय जयभिम!' आंदोलकांच्या हातात एकच फोटो होता, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा. निळा झेंडा डौलाने फडकत होता. ७५ वर्षांच्या काळात हे चित्र, हा देखावा प्रथमच पाहिले. हे फक्त आणि फक्त अभिजीत दिपकेमुळे घडले आणि छाती अभिमानाने फुगून गेली. त्यामुळे अभिजीत दिपके कौतुकास आणि गौरवास पात्र ठरला. आजपर्यंत भल्या भल्यांना हे जमले नाही. देशाच्या कानाकोपऱ्याततून जात हद्दपार करून लाखो तरूणांनी त्याला आपला नेता मानला, त्यांच्यावर विश्वास टाकला आणि अखेरपर्यंत तेवढ्याच विश्वासाने साथही दिली. म्हणूनही दिपके सरस आणि अभिनंदनास पात्र ठरतो. अहंकारी प्रवृतीच्या सरकारला शेवटी गुडघ्यावर आणले आणि सरकारद्वारे चर्चेची दारे खूली झाली, ही काही साधी कामगिरी नव्हती.



या देशाला विकासाकडे झेप घ्यायची असेल तर बाबासाहेब आंबेडकरांच्या शांतीपूर्वक संवैधानिक मार्ग स्विकारावा लागेल हा संदेश दिपके यांनी दिला. जागृतीच्या विझलेल्या मशाली पुन्हा प्रज्वलीत करण्याचे सामर्थ्य संविधानात आहे, हे त्याने सिद्ध करून दाखविले.

दिपके हे कुठल्याही घटनेकडे कसा सकारात्मक दृष्टिकोनातून पाहतो, त्याचं एक आंदोलनादरम्यान घडलेलं उदाहरण एका महिलेने दिपकेच्या चेहऱ्यावर शाई फेकली. तेव्हा दिपके म्हणाला, 'शाई निळी आहे आणि मी बाबासाहेबांचा अनुयायी आहे. हा तर माझाच रंग आहे.'

त्याने समर्थकांना शांत राहण्याचे आवाहन केले आणि हिंसेचे उत्तर अत्यंत वैचारिक मार्गाने दिले. त्याने आपल्या समर्थकांना स्पष्ट केले की बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीचं आणि आंबेडकरी चळवळीचं प्रतीक असलेला हा निळा रंग हा माझा अपमान नसून सन्मान आहे. या प्रतिक्रियेमुळे त्यांनी हिंसेला अहिंसेने आणि वैचारिक संयमाने उत्तर देण्याचा प्रयत्न केला. दीपके यांनी भारत देशाच्या राजकारणाची दिशाच बदलून टाकली. बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः युवकांमध्ये शिक्षण, रोजगार आणि संविधान या मुद्द्यांवर नव्या प्रकारची राजकीय जागृती दिसून आली. ही एक क्रांतिकारी घटना म्हणावी लागेल. तेव्हा आंबेडकरी राजकीय पक्षांनी आतातरी त्याच्या कर्तृत्वाची दखल घेणे क्रमप्राप्त आहे.

जेन-झी च्या आंदोलनानंतर देशाचं राजकीय चित्र बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाजप आघाडीला २०२९ ची लोकसभा निवडणुक जिंकणे फार जड जाणार आहे. सरकारकडून विद्यार्थ्यांवर जो क्रूरतेने लाठीमार, अश्रधूर, पॅलेट गनचा वापर करून रक्त सांडवले, विद्यार्थ्यांना विजेचे चटके दिले, विद्यार्थीनींचे पोलिसांनी विनयभंग केला. या मुद्द्यावरून विरोधी पक्ष एकत्र येऊन जोरकसपणे संसदेत आणि रस्त्यावर येऊन संघर्ष करीत आहेत. त्यामुळे सत्तापालट होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

पण २०२९ च्या निवडणुकीत आंबेडकरी पक्षांची काय भूमिका राहील? परत 'एकला चलो रे' ची भूमिका घेतील की काय? परत एकाकी पडतील की काय? असे अनेक प्रश्न बहुतेकांच्या मनात येत असतील.

**आंबेडकरी पक्षांकडे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तीन पर्याय उपलब्ध आहेत.**

**१. 'एकला चलोरे'.** ही भूमिका प्रत्येक आंबेडकरी पक्ष प्रत्येक निवडणुकीच्या वेळी घेत आला आहे. मग तो बहुजन समाज पक्ष असो की वंचित बहुजन आघाडी असो. विरोधी पक्षांनी जर एखाद्यावेळी पाचारण केले तर अटी टाकून अडेलतट्टूची भुमिका घेतली जात होती, असे विरोधी पक्षांचे म्हणणे होते. दुसरी बाजू ही होती की त्यांनाही वाटेकरू नको होते. म्हणून ते या ना त्या कारणाने डावलण्याचा प्रयत्न करत होते. हा दोन्हीही बाजूंचा डावपेचांचा भाग होता. पण एकला चलोरेच्या भुमिकेमुळे नाही विरोधी पक्षांचा फायदा होतो, नाही आंबेडकरी पक्षांचा! फायदा होतो तो भाजप आघाडीला. 'तुला ना मला टाक कुत्र्याला' अशी गत होत होती.

**२. दुसरा पर्याय आहे, आंबेडकरी पक्षांची आघाडी.** जर ब्राह्मणवादी विचारसरणीतील पक्ष भाजपाच्या छत्रछायेखाली एकत्र येऊ शकतात, जर गांधीवादी, मार्क्सवादी, समाजवादी या विचासरणीचे पक्ष इंडिया आघाडी म्हणून एकत्र येतात, मग आंबेडकरी विचारसरणीचे पक्ष परिवर्तन आघाडी म्हणून का एकत्र येऊ शकत नाही, हा मोठा गहन प्रश्न आहे.

**३. तिसरा पर्याय आहे,** भाजप आघाडीच्या छत्रछायेखाली जाऊन जे मिळेल ते घ्यायचं! यात भाजप आघाडीत जायचं म्हणजे समाजाशी प्रतारणा करणे होय. म्हणून हा पर्याय समाज स्विकारू देणार नाही. अभिजित दीपके हा जरी आंबेडकरी समाजाचा आणि विचारसरणीच्या बाजूचा असला तरी त्यांचे नेतृत्व एका समाजापुरते मर्यादित न राहता व्यापक सामाजिक प्रश्नांवर केंद्रित राहण्याचा त्याचा प्रयत्न राहील असे दिसते. सर्व भारतीय समाजाचा तो आवाज बनला आहे. त्याने जाहीर करून टाकलं आहे की, काक्रोच जनता पार्टी ही राजकारणात उतरणार नाही, तर दबाव गट म्हणून व्यवस्था सुधारण्याचे काम करीत राहील. आपण जर मागे वळून पाहिले तर लोकसभेच्या २०२४ च्या निवडणुकीत आंबेडकरी जनतेचा कल हा इंडिया आघाडीकडे वळला होता. कारण भाजपच्या '४०० के पार' घोषणेमुळे संविधानाला धोका निर्माण झाला होता. म्हणून त्याला शह देण्यासाठीच इंडिया आघाडीच्या बाजूने आंबेडकरी समुहाचे मतदान झाले होते. त्यामुळे सर्व आंबेडकरी पक्ष गारद झाले होते. हा अनुभव दुर्लक्षित करता येणार नाही. आता येणाऱ्या निवडणुकीत अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून आतापासूनच आंबेडकरी पक्षांनी काळजी घेणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:** आगामी काळात आंबेडकरी पक्षांनी केवळ स्वतंत्र राजकारणावर भर द्यायचा की व्यापक आघाड्यांचा भाग व्हायचे, हा महत्त्वाचा प्रश्न त्यांच्या समोर उभा आहे.

**आर.के.जुमळे**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# ‘थर्ड-पार्टी विमा नाही तर इंधन नाही’

## सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली** – थर्ड-पार्टी विमा नसलेल्या वाहनांना पेट्रोल पंपांवर इंधन देण्यास नकार देणारा प्रायोगिक प्रकल्प सुरू करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला मंगळवारी दिले.

सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय महामार्गांवर होणाऱ्या रस्ते अपघातांची संख्या आणि टोल प्लाझावरील लांबच लांब रांगांच्या परिणामांची नोंद घेतली. टोल नाक्यांवर वाहने थांबवण्याच्या प्रक्रियेऐवजी



स्वयंचलित ओळख प्रणालीचा वापर करून काही कॉरिडॉरवर पायलट प्रोजेक्ट लागू करण्याचे निर्देश केंद्राला दिले. सर्व वाहनांना ‘थर्ड-पार्टी’ संरक्षण देणारी वैध विमा पॉलिसी असणे बंधनकारक करणाऱ्या मोटर वाहन कायद्याच्या तरतुदींचे पालन होत नसल्याबद्दल न्या. संजय करोल आणि न्या. प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने चिंता व्यक्त केली. वित्तविषयक स्थायी समितीच्या २०२४-२५ च्या अहवालानुसार, भारतातील रस्त्यांवर धावणारी तब्बल ५६ टक्के वाहने अजूनही विम्याशिवाय आहेत ही धक्कादायक बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन कारसाठी चार वर्षांचा विमा बंधनकारक खंडपीठाने निर्देश दिले, यापुढे नवीन कारसाठी चार वर्षांचा आणि नवीन दुचाकींसाठी सहा वर्षांचा थर्ड-पार्टी विमा खरेदी करणे बंधनकारक राहील. आयआरडीएने या संदर्भात तातडीने आवश्यक सूचना जारी कराव्यात.

# ‘सेल्फी’चा थरार जीवावर बेतला! देवी पॉइंटवरील झुल्यावरुन पर्यटक कोसळला

## युवक कोमात गेल्याने अमरावतीला रेफर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**चिखलदरा** – पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी चिखलदऱ्यात आलेल्या एका तरुणावर देवी पॉईटवरील झुला जीवघेणा ठरला.

झुल्यावरून खाली कोसळून डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने २६ वर्षीय पर्यटक सध्या कोमात असून त्याच्यावर अमरावतीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे चिखलदऱ्यातील पर्यटनस्थळांवरील खासगी झुल्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न



पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जखमी युवकाचे नाव मेश्राम (वय २६, रा.हिवरा) असे आहे. रविवारी तो मित्रांसह चिखलदऱ्यात फिरण्यासाठी आला होता. प्रसिद्ध देवी पॉईटवर उभारण्यात आलेल्या विशाल झुल्यावर तो झुलत असताना अचानक तोल जाऊन तो खाली कोसळला. या अपघातात त्याच्या डोक्याला जबर मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला.

घटनेनंतर मित्रांनी आणि स्थानिकांनी तातडीने त्याला चिखलदरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्याला अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून वैद्यकीय सूत्रांच्या माहितीनुसार तो कोमात आहे. घटनेची माहिती मिळताच चिखलदरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण आणि झुल्याच्या सुरक्षिततेबाबत तपास सुरू करण्यात आला आहे.

### पर्यटकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष?

पावसाळ्यात चिखलदऱ्यात दररोज हजारो पर्यटक येत असताना पर्यटनस्थळांवरील झुले, सेल्फी पॉईट आणि इतर साहसी उपक्रमांची नियमित तपासणी होते का, असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित झाला आहे. पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेता सुरक्षेचे कडक नियम आणि प्रशासनाची प्रभावी देखरेख आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### सरकारी जागेवर झुले : परवानगी कुणाची?

या अपघातानंतर देवी पॉईट परिसरात उभारण्यात आलेल्या खासगी झुल्यांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सरकारी जागेवर हे झुले कोणाच्या परवानगीने उभारण्यात आले, त्यासाठी आवश्यक तांत्रिक तपासणी व सुरक्षिततेचे निकष पाळले गेले होते का, याबाबत प्रशासनाने अद्याप स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. पर्यटकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा व्यवसायांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अशोक चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणुन माजी शिक्षक चंद्रशेखर मानकर तसेच ज्येष्ठ शिक्षक किशोर मांडेकर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी गुरुपौर्णिमे निमित्त शिक्षकांचा सत्कार तसेच विद्यार्थ्यांसाठी मराठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट हस्ताक्षराचे दर्शन घडविले. याशिवाय शाळेत आयोजित करण्यात आलेल्या वर्ग सजावट स्पर्धेतील विजेत्या वर्गांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

यावेळी मुख्याध्यापक अशोक चौधरी यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, सामाजिक कार्य आणि लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रसेवेचा आदर्श विद्यार्थ्यांनी अंगीका असे आवाहन केले.

प्रमुख शिस्त आणि संस्कार यांचे अतिथींनीही विद्यार्थ्यांना महत्त्व पटवुन दिले. संचालन सिमा गजभिये आणि आभार करुणा शिंदे यांनी मानले.

# राज्यात २३ अतिरिक्त विशेष जलद गती न्यायालये स्थापन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – सार्वजनिक परीक्षांमधील प्रश्नपत्रिका फूट आणि इतर गैरप्रकारांशी संबंधित गुन्ह्यांची विशेष सुनावणी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्रात आणखी २३ विशेष जलद गती न्यायालये स्थापन केली आहेत.

यामुळे राज्यातील अशा न्यायालयांची व्याप्ती अधिक विस्तारली आहे. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांनी १ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या



अधिसूचनेनुसार, ’सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्गांना प्रतिबंध) कायदा, २०२४’, ’भारतीय न्याय संहिता’मधील संबंधित तरतुदी आणि ’महाराष्ट्र विद्यापीठ, मंडळ व इतर विशिष्ट परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालणारा कायदा, १९८२’ अंतर्गत खटले चालवण्यासाठी विविध जिल्ह्यांमध्ये न्यायिक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. सुनावणीसाठी विशेष नियुक्ती नव्याने अधिसूचित केलेली ही न्यायालये बीड, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, जळगांव, जालना, कोल्हापूर, नाशिक, धाराशिव, परभणी, पुणे आणि सांगली जिल्ह्यांमध्ये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय सातारा, सोलापूर, ठाणे, वर्धा, यवतमाळ, वाशीम आणि नंदुरबार येथेही अशी न्यायालये अधिसूचित केली गेली आहेत.

# तीन वर्षांत मेट्रो प्रकल्प पूर्ण करा! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

## २ लाख ८० हजार कोटींच्या मेट्रो जाळ्याला गती

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित, आधुनिक, जलद आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पांना वेग देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले. अनावश्यक विलंबामुळे



होणारी प्रकल्पातील खर्चवाढ टाळण्यासाठी काम सुरू झाल्यापासून मेट्रो प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन करा, असे निर्देशही फडणवीस यांनी यावेळी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील प्रस्तावित नवे मेट्रो प्रकल्प आणि सध्या सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पांची माहिती देण्यात आली. सध्या राज्यात १७४ कि.मी. मेट्रो मार्ग प्रवाशांसाठी सुरू झाले असून २९१ कि.मी. मार्गांवर प्रत्यक्ष बांधकाम सुरू आहे. याशिवाय १३० कि.मी. मार्ग मंजुरीच्या प्रक्रियेत असून ८७.१५ कि.मी. मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. मेट्रो-१० मार्गाची उभारणी लवकरच यावेळी बैठकीत मीरा गाव ते गायमुख या मेट्रो-१० मार्गाची माहिती देण्यात आली.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ९९ रुपयांत बसपास

## सर्व देणी देईपर्यंत सुविधा लागू, ७ ऑगस्ट रोजी बेस्टच्या वर्धापन दिनी होणार वाटप

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणी देईपर्यंत त्यांना ९९ रुपयांत बसपास उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



७ ऑगस्ट रोजी बेस्ट उपक्रमाचा वर्धापनदिन असून यादिवशी महापौर रितू तावडे यांच्या हस्ते पाच हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बसपासचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती बेस्ट समिती अध्यक्षा तृष्णा विश्वासराव यांनी दिली. बेस्ट उपक्रमातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बसपास देण्याबाबतचा प्रस्ताव मंगळवारी झालेल्या बेस्ट समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ९९ रुपयांत बसपास देताना त्यांचा फोटो पासवर लावणे अपेक्षित आहे. यामुळे सेवानिवृत्त कर्मचारी बेस्ट भवनात आल्यावर त्यांचा सन्मान राखला गेला पाहिजे, असे मत बेस्ट समिती सदस्य नितीन नांदगावकर यांनी यावेळी मांडले. परंतु ‘चलो अ‍ॅप’च्या माध्यमातून बसपास देण्यास विरोध असल्याचे नांदगावकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

# चांदवडसह ४ शहरांत न्यायालयांची स्थापना : राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – नाशिक जिल्ह्यातील चांदवडसह सिल्लोड, किनवट, केज अशा चार शहरात न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

त्यानुसार चांदवड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन होणार आहे. यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या न्यायिक अधिकारी आणि सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या पदांमधून चांदवड न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या पदासह २१ नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथे जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच सरकारी वकील कार्यालय स्थापन करण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या न्यायिक अधिकारी आणि सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या पदांमधून या न्यायालयासाठी जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्या एक पदासह न्यायालयासाठी २० नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## महाराष्ट्र स्टेट इले. बोर्ड एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीची

# ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपुर्ण वातावरणात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील काठीवाले सभागृहात महाराष्ट्र स्टेट इले. बोर्ड एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. यांची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली.





सभेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनचे अध्यक्ष कॉम्रेड पी.बी.उके होते. प्रमुख अतिथी म्हणुन कोषाध्यक्ष कॉ. देवेंद्र तवर, उपसरचिटणीस कॉ.विवेक महाले, कॉ.सुनीलभाऊ देशमुख, कॉ.टी.एम. गवळी उपस्थित होते. बक्षीस वितरणासाठी मोर्शीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विनोद काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होते. या प्रसंगी कॉ.विनोद गोरले, सतिश जायले, संजय जयस्वाल, कॉ.दिपक विधळे, कॉ.कहाते, कॉ.व्हि.एल.बेहरे, कॉ.सुखलाल कैथवास, कॉ.विठ्ठलराव बेले, कॉ. श्रीधर वानखडे, कॉ.कपिल झाडे, मुकेश मोरे, दिनेश शेकापुरे, दिपक पिढेकर, राजेंद्र पाटणकर, महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिसिटी बोर्ड एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी वरुडचे अध्यक्ष किशोर तिडके, उपाध्यक्ष रविंद्र कुमरे, सचिव सुनिल बावणकर, सहसचिव दुर्गादास बन्सोड, संचालक नरेंद्र चिमोटे, निलेश तरुडकर, सुमित पाध्ये, चंद्रशेखर भिसे, अतूल बावणे, रोषनी धोटे, किरण पवार तसेच अनेक ज्येष्ठ पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. त्यानंतर अहवाल वर्षात निधन झालेल्या सभासदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सभेत गुणवंत सभासदांच्या पाल्यांचा तसेच वरूड तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशांचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. तसेच अमरावती येथील दृष्टिहीन गुणवंत विद्यार्थ्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी सहकार, शिक्षण व सामाजिक उत्तरदायित्व यांचे महत्त्व अधोरेखित करत मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी सभासदांना प्रेरणा मिळाली.

प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष किशोर तिडके , संचालन कॉ. सुनील बावनकर व तृप्ती विधे तर आभार निलेश तरुडकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी व्यवस्थापक रविंद्र काळे, लिपिक रोशन वाघमारे, शिपाई दिपक अंबाडकर, व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# ‘नशामुक्त भारत अभियान’ उत्साहात : विविध स्पर्धांचे आयोजन

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**अमरावती** – युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या मेरा युवा भारत केंद्रातर्फे विद्याभारती महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ’नशामुक्त भारत अभियान २०२६’ अंतर्गत विविध कला स्पर्धांचा सोहळा पार पडला. ’विकसित भारतासाठी नशामुक्त युवा’ हे प्रमुख उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्याभारती महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.मिथिलेश राठोड अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक किरण वानखेडे, पोलीस उपअधीक्षक डॉ.प्रज्ञा येनकर उपस्थित होत्या. यावेळी वानखेडे यांनी, युवकांनी केवळ स्पर्धा म्हणून या कार्यक्रमाकडे न बघता समाजात जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी, तरच नशामुक्त भारताचे उद्दिष्ट साध्य होईल, असे सांगितले. या अभियानांतर्गत आठ कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. लघुपट, रील स्पर्धेत गुंजन शेवाटकर, संगीत, लोकगीत स्पर्धेत हिमांशी, स्लॅम पोएट्री, कविता सादरीकरणात कृपाली गव्हाणे, घोषवाक्य लेखन स्पर्धेत भूमिका चारतुरकर, नृत्य स्पर्धेत महेक गुप्ता, पथनाट्य, मूकनाट्य स्पर्धेत अनुज माहुलकर, चित्रकला स्पर्धे अवंतिका पाटील, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत मुस्फेरा शेख यांची प्रथम क्रमांक पटकविला. यामध्ये प्रथम क्रमांक मिळवणारे विजेते



मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत अमरावतीचे प्रतिनिधित्व करणार आहेत. स्पर्धेतील सर्व प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले, तसेच इतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

जिल्हा युवा अधिकारी अक्षय निपाणे यांनी प्रास्ताविक केले. भाग्यश्री कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, मेरा युवा भारतचे लेखापाल अजिंक्य गवळी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी नरेंद्र घुर्डे, स्नेहा वानखेडे, सतीश वाघमारे यांनी पुढाकार घेतला.

# योजनेचा लाभ देण्यासाठी सहकार विभाग व बँकानी समन्वयाने कामे करुन कामाला गती द्या : जिल्हाधिकारी आशिष येरेकर

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

## जिल्ह्यातील सहायक निबंधक आणि बँकांचा घेतला आढावा



**अमरावती** – जिल्ह्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर झाली असून शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी सर्व तालुका स्तरावरील सहायक निबंधकांनी केवायसी शिल्लक असणाऱ्या शेतकऱ्यांची यादी दररोज उपलब्ध करून देत कामाला गती द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज आढावा बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल सभागृहात जिल्हाधिकारी श्री येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व तालुक्यांतील सहायक निबंधक आणि बँकाच्या प्रतिनिधींची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. याबैठकीत त्यांनी या सूचना केल्या. निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार आदी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या ऐतिहासिक योजनेंतर्गत सहकार विभागामार्फत जिल्ह्यातील १ लाख २४ हजार १४२ शेतकऱ्यांची यादी शासनाच्या महाआयटी पोर्टलवर भरण्यात आली. २५ जुलै २०२६ रोजी जिल्ह्यातील ७६ हजार ९७६ पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली असून आतापर्यंत यापैकी ४६ हजार ४२१ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले आहे. कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर (सेतु) आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे.

तसेच ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी शिल्लक आहे त्यांची यादी संबंधित तहसिल कार्यालयाला देवून नोंदणी करून घेत या कामास गती देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या कामास प्राधान्य देवून सार्वजनिक सुटीच्या दिवशीही सेतु केंद्र आणि बँका सुरु ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# स्नॅपचॅट, इंस्टाग्राम व फेसबुक विद्यार्थ्यांनी शक्यतो टाळावे

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

## ठाणेदार राहुल गवई यांचे विद्यार्थ्यांना आवाहन




***शेंदूरजनाघाट*** – स्नॅपचॅट, इन्स्टाग्राम व फेसबुक विद्यार्थ्यांनी शक्यतो टाळावे, आवाहन ठाणेदार राहुल गवई यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना केले.

स्थानिक मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन द्वारा संचालित स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू मीडल स्कूल येथे वृक्षारोपण व पर्यावरण रक्षण जनजागृती तसेच इको क्लब फॉर मीशन लाईफ अंतर्गत ‘एक पेड माँ के नाम’ हा उपक्रम राबविण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना वृक्षारोपण व पर्यावरण विषयक माहिती देत ऑपरेशन कवच मोहिमे अंतर्गत विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, कायदेशीर बाबी, व्यसनमुक्तीचे महत्त्व तसेच सायबर फ्रॉड आणि सायबर हेल्पलाईन डायल ११२, तसेच हेल्मेट वापरा ही माहिती देऊन तर नईम शेख जरूडकर यांनी वृक्षारोपण व पर्यावरण रक्षण जनजागृती आणि ‘एक पेड माँ के नाम’ या उपक्रमा सोबतच विद्यालयात राबवील्या जाणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. शाळेच्या परिसरामध्ये शेंदुर्जनाघाट पोलीस स्टेशनचे ठाणेदार राहुल गवई यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी शाल व पुष्पगुच्छ देऊन नईम शेख जरूडकर यांच्या हस्ते ठाणेदार राहुल गवई यांचा सत्कार करण्यात आला तसेच इयत्ता सातवी मधून शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी ठरणाऱ्या फजीला वसीमशहा हिचा ठाणेदार गवई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन नईम खान यांनी तर आभार व्यवस्थापक एहराज फैसल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# कोल्हापुरात बंद घरात भीषण स्फोट : जिलेटिनच्या काड्यांचा वापर झाल्याचा संशय, पोलिसांचा तपास सुरू

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**कोल्हापूर** – कोल्हापूर शहरातील सुर्वे नगर परिसरात एका बंद घरात झालेल्या भीषण स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या स्फोटात कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी संबंधित घरासह आजूबाजूच्या अनेक घरांचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेनंतर पोलिसांनी परिसर सील करून तपास सुरू केला आहे. प्राथमिक तपासात हा स्फोट अपघाती नसून मुद्दाम घडवून आणल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. उच्च क्षमतेच्या स्फोटक साहित्याचा वापर करण्यात आल्याचे प्राथमिक निष्कर्ष असून, जिलेटिनच्या काड्यांच्या सहाय्याने घर उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला असावा, असा पोलिसांचा अंदाज आहे.स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की, बंद घराच्या भिंती आणि छताला तडे गेले, तर शेजारील अनेक घरांच्या काचा फुटल्या आणि भिंतींचेही नुकसान झाले. मोठा आवाज ऐकून नागरिक घाबरून घराबाहेर आले आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. तसेच फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आले असून, स्फोटाच्या ठिकाणाहून नमुने गोळा करून तपासासाठी पाठवण्यात आले आहेत. नेमके कोणते स्फोटक आणि किती प्रमाणात वापरण्यात आले, याचा शोध घेतला जात आहे.

# सिद्धिविनायक मंदिरातील कथित देणगी घोटाळा प्रकरणी एकनाथ शिंदेकडून सखोल चौकशीचे आदेश

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

## दोषी आढळ्यास कारवाईचा बडगा!



**मुंबई** – मुंबईतील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिरातील कथित देणगी घोटाळा प्रकरणात एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंदिरात गेल्या पाच वर्षांत प्राप्त झालेल्या रोख देणग्या, दागिने तसेच इतर मौल्यवान वस्तूंचे विशेष लेखापरीक्षण (ऑडिट) करण्याचे आदेश दिले आहेत. मंदिरात आलेल्या देणग्यांची नोंद, आर्थिक व्यवहार, दागिन्यांचा हिशेब आणि त्यांच्या व्यवस्थापनाची सखोल तपासणी या ऑडिटद्वारे केली जाणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, या लेखापरीक्षणाचा अहवाल आल्यानंतर संबंधित बाबींवर पुढील निर्णय घेतला जाणार असून, अनियमितता आढळल्यास संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मंदिर न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी काल (४ ऑगस्ट) एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंदिरातच्या चौकशीचे निर्देश दिले आहे.

देणगी घोटाळा प्रकरणात सखोल चौकशीचे आदेश; दोषी आढळ्यास कारवाईचा बडगा! दरम्यान, श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी काल (मंगळवार) मंत्रालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. जवळ जवळ २० मिनटे या दोघांची भेटीदरम्यान चर्चा झाली. या भेटीनंतर मंदिरातील कथित देणगी घोटाळा प्रकरणात महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्त यांना या संदर्भात आदेश देण्यात आले आहे. मंदिरात गेल्या पाच वर्षांत प्राप्त झालेल्या रोख देणग्या, दागिने तसेच इतर मौल्यवान वस्तूंचे विशेष लेखापरीक्षण (ऑडिट) करण्याचे आदेश दिले आहेत. यात मंदिराच्या आर्थिक व्यवहार आणि व्यवस्थापनाची सखोल चौकशी होणार आहे. तसेच यात गैरप्रकार आणि अनियमितता आढळ्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असं सूत्र सांगतायत. पाच वर्षातील देणग्या आणि मौल्यवान वस्तूंचे यामध्ये ऑडिट होणार आहे. अतिरिक्त मुख्य सचिव यांना या संदर्भात अहवाल देण्याचे निर्देश देण्यात आले. देणग्या, दागिने, इतर मौल्यवान वस्तूंचे विशेष लेखापरीक्षण करण्याचे आदेश दरम्यान, या संपूर्ण लेखापरीक्षणांमध्ये मंदिरात गेल्या पाच वर्षांत किती देणगी, मौल्यवान दागिने आणि इतर वस्तू देणगी स्वरूपात प्राप्त झाली, त्याचबरोबर किती आर्थिक व्यवहार झालेले आहेत, त्या सगळ्याचा हिशोब देण्यास सांगितलेला आहे.

## जाहीर नोटीस

**भारतीय उत्तराधिकारी अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५२९/२०२६** **ने.ता.२४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती संध्या प्रल्हादराव पोतदार, वय अं.६९ वर्ष, धंदा-गृहिणी, २) पराग प्रल्हादराव पोतदार, वय अं.४४ वर्ष, धंदा-खाजगी नोकरी, क्र.१ व २ रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, हु.मु.त्रिमुर्ती नगर, नागपूर, ३) सौ.प्राची हेमंतराव भगत, वय अं.४६ वर्ष, धंदा- वैद्यकिय, रा.सावनेर, ता.सावनेर, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत प्रल्हाद अजाबराव पोतदार, रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात भारतीय उत्तराधिकारी अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६०५/२०२६** **ने.ता.२४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) मोरेश्वर वसंतराव पवार, वय अं.५२ वर्ष, धंदा-शेती
२) योगेश्वर वसंतराव पवार, वय अं.४६ वर्ष, धंदा- शेती
३) निलीमा प्रफुलराव भुजाडे, वय अं.४९ वर्ष, धंदा- गृहिणी
क्र.१ ते ३ रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती
४) अनुज संतोष बारस्कर, वय अं.१९ वर्ष, धंदा- शिक्षण
५) श्रेया संतोष बारस्कर, वय अं.२७ वर्ष, धंदा- शिक्षण
क्र.४ व ५ रा.बैतुल, ता.जि.बैतुल

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मंजुळा वसंत पवार, रा.वठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१७/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# देशभरात मुसळधार पावसाचा कहर : झारखंड-उत्तर प्रदेशात वीज कोसळून १६ जणांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**झारखंड** – देशातील अनेक राज्यांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसासोबत वीज कोसळण्याच्या घटनांमध्ये मोठी जीवितहानी झाली आहे. मंगळवारी झारखंड आणि उत्तर प्रदेशात वीज कोसळून एकूण १६ जणांचा मृत्यू झाला असून



अनेक जण जखमी झाले आहेत. दरम्यान, मुसळधार पावसामुळे अनेक राज्यांतील जनजीवनही विस्कळीत झाले आहे. झारखंडमध्ये गिरिडीह, दुमका आणि लातेहार जिल्ह्यांमध्ये वीज कोसळल्याने १३ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. मृतांमध्ये गिरिडीहमधील ८, दुमकामधील ३ आणि लातेहारमधील २ जणांचा समावेश खोरिमहुआचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमरेंद्र कुमार यांनी सांगितले की, गिरिडीह जिल्ह्यातील विविध भागांत वीज कोसळून सात जणांचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले. याशिवाय बागोदर परिसरात आणखी एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. दुमका जिल्ह्यातील रामगढ भागात वेगवेगळ्या ठिकाणी वीज कोसळून तीन जणांचा मृत्यू झाला, तर एका मुलासह चार जण जखमी झाले. लातेहार जिल्ह्यातही दोन जणांचा मृत्यू झाला असून एक महिला गंभीर जखमी झाली आहे. उत्तर प्रदेशातही वीज आणि विजेच्या धक्क्यामुळे तीन जणांचा मृत्यू झाला.

# ‘पारधी समाजातील महिला अस्वच्छ, अंघोळ करत नाहीत, कुटुंबात दारुचा व्यवसाय, आमच्या बँकेत त्यांची खातीच नकोत..’

## काटोलमधील बँक ऑफ इंडिया शाखेतील अधिकाऱ्यांचा मस्तवालपणाचा कळस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**काटोल** – पारधी महिला अस्वच्छ असतात, आंघोळ करत नाही, त्यांच्या कुटुंबातील लोक दारूचा व्यवसाय करतात, म्हणून त्यांचे बँक खाते आमच्या बँक शाखेत नको म्हणत थेट अधिकार नाकारण्याचा कारनामा काटोलमधील बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांनी केली आहे.

पारधी महिलांनी हे गंभीर आरोप लावल्यानंतर एबीपी माझाने बँकेकडून महिलांचे खाते सुलभतेने उघडण्यासाठी नेमलेल्या




‘बँक सखी‘ सोबत फोनवर संवाद साधल्यानंतर त्यांनी सुद्धा अत्यंत धक्कादायक प्रकाराला दुजोरा दिला. ‘बँक सखी‘ला फोन लावून कॉल स्पीकरवर ठेवत कॉल रेकॉर्ड केले. तेव्हा त्यांनीही काही बँक अधिकाऱ्याना या पारधी महिलांचे बँक खाते बँकेत नको आहे, पारधी महिलांचे कुटुंबीय दारूचा व्यवसाय करतात म्हणून त्यांची खाती बँकेत नकोत, अशी काही अधिकाऱ्यांची भूमिका असल्याची माहिती बँक सखीने दिली. कोणाच्या व्यवसायाशी बँकेचे काय संबंध, आपण सर्व आवश्यकडॉक्युमेंट्स पुरवणाऱ्या महिलांचे बँक खाते उघडून दिले पाहिजे, अशी विनंती केल्यानंतरही वरिष्ठ अधिकारी ऐकायला तयार नसल्याची प्रतिक्रिया बँक सखीने एबीपी माझाशी फोनवर संवाद साधताना दिली. नागपूर जिल्हा परिषदेच्या ‘उमेद‘ योजनेअंतर्गत ग्रामीण महिलांमध्ये ‘उपजीविका सखी‘ म्हणून काम करणाऱ्या वनिता पाटील यांच्याशी संपर्क साधला. वनिता पाटील यांनी डोंगरगावमधील पारधी महिलांची बँक खाती उघडण्यासंदर्भात गेल्या काही दिवसात घडलेल्या घडामोडी सविस्तर सांगितल्या.

### गाडी चालवणाऱ्यांची धाकधूक वाढली! आता पेट्रोल पंपावर होणार ‘ही’ मोठी तपासणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**दिल्ली** – रस्ते सुरक्षा अधिक प्रभावी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत, वैध विमा नसलेल्या वाहनांना पेट्रोल किंवा डिझेल देण्यास नकार देण्याची शिफारस केली आहे. हा बंधनकारक आदेश नसला तरी, तो धोरणात्मक उपाय म्हणून स्वीकारला जाऊ शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले. यासोबतच सर्वोच्च न्यायालयाने भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाला पेट्रोल पंपांवर वाहनांचा विमा तपासण्यासाठी प्रायोगिक (पायलट) प्रकल्प तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

## विवाहितेचा शारिरीक व मानसिक छळ करणाऱ्या

# पतीसह सासरकडील ४ जणांविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – विवाहितेचा शारिरीक व मानसिक छळ करणाऱ्या पतीसह सासरकडील ४ जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सविस्तर माहीती नुसार, १० जुन २०२५ ते ३१ जुलै २०२६ दरम्यान पती, सासु, सासरे व ननद यांनी घरगुती कारणावरुन व माहेरवरुन पैसे आणने कामी तगादा लावुन शिवीगाळ करुन मानसिक व शारिरीक छळ केला, अशा फिर्यादी दुर्गा गजानन गंधे (२९) हिच्या तक्रारीवरुन आरोपी पती शुभम गजानन गंधे (३०),




सासरे गजानन विठ्ठलराव गंधे (५५), सासु राजकन्या ग.गंधे (५०) तिन्ही रा.वाठोडा हैबतपुर, ता.आर्वी, जि.वर्धा, शुभांगी राजु रोकडे (२७) रा.गाडेगाव ह.मु.वाठोडा हैबतपुर, ता.आर्वी, जि.वर्धा यांचे विरुध्द कलम ८५, ३५२, ३ (५) बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

# बनावट कागदपत्रे सादर केल्यास प्रवेश रद्द होणार

### विद्यार्थ्यांविरुद्ध होणार कारवाई, सीईटी कक्षाचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत सध्या विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

या प्रवेश प्रक्रियेमध्ये तपासणी दरम्यान किंवा




पडताळणीअंती सादर केलेली कागदपत्रे चुकीची, खोटी, बनावट किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश तत्काळ रद्द करण्याचा निर्णय कक्षाने घेतला आहे. तसेच संबंधित विद्यार्थ्याविरुद्ध नियमांनुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरताना अनाथ, संरक्षण दल, दिव्यांग, अल्पसंख्यांक या आरक्षणाचे लाभ मिळिवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड केलेली आहेत. कागदपत्रांची योग्य पडताळणी न करता प्रवेश निश्चित केला आहे असे सिध्द झाल्यास अशा संस्थावर देखील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

# ‘तुम्ही काम सुधारा, नाहीतर मला खांदेपालट करावा लागेल’

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याल पक्षातील काम न करणाऱ्या काही मंत्र्यांना फैलावर घेतल्याची माहिती समोर आली आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीपूर्वी शिवसेना पक्षाची स्वतंत्र प्री–कॅबिनेट बैठक पार पडली. या



बैठकीत एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या चार मंत्र्यांना सज्जड दम दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. यामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, वने, मदत व पुनर्वसन तसेच मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा समावेश आहे.

या मंत्र्यांनी आगामी काळात आपल्या कामगिरीत सुधारण न केल्यास त्यांचे मंत्रिपद काढून घेतले जाऊ शकते, अशी चर्चा सध्या राजकीय वतुर्ळात रंगली आहे.

# भरधाव कंटेनर डिव्हायडर तोडून विरुद्ध दिशेच्या ट्रकला धडकला : पुण्याकडे येणारी वाहतूक ठप्प, पुणे-नाशिक महामार्गावरील घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – पुणे–नाशिक महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. नाशिककडून आलेला कंटेनर डिव्हायडर तोडून विरुद्ध दिशेला गेला अन पुण्याच्या दिशेने येणाऱ्या ट्रकला धडकलाय. या भीषण धडकेत ट्रक



खाली कोसळला आणि त्याखाली वेगन–आर ही कार दबली आहे. तर अपघातात दोन्ही गाड्यांचा अक्षरशः चेंदामेंदा झाला आहे. सुदैवाने या भीषण अपघात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. प्राथमिक माहितीनुसार खेड तालुक्यातील वाकी जवळ हा अपघात सकाळी सव्वा सहाच्या सुमारास झाल्याची माहिती आहे. दरम्यान, अपघातात कंटेनर पुणे लेनवर आल्याने, पुण्याकडे येणारी वाहतूक तासाभरापासून ठप्प आहे.

तर नाशिककडे जाणारी वाहतूक ही विस्कळीत झालेली आहे.महामार्ग पोलीस क्रेन घेऊन घटनास्थळी पोहचले असून अपघातग्रस्त वाहनं बाजूला घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरुयेत. मात्र या भीषण अपघातात परिसरात मोठी खळबळ उडाली असून दोन्ही गाड्यांचा अक्षरशः चेंदामेंदा झाला आहे.




